पिंपरी चिंचवड महानगरपालिका,फ प्रभाग कार्यालय

कार्यपत्रिका क्रमांक ८

सभावृत्तांत

दि.१२/११/२०१४ वेळ. दु. १२.०० वाजता

.........................................................................................................................................

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग समितीची दि. १२/११/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील सभागृहात सभा आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा.वनिता एकनाथ थोरात मा.सभापती
२. मा.सोनवणे पौर्णीमा रविंद्र (आप्पा)
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापू
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.स्वाती प्रमोद साने
६. मा.सायकर अजय शंकरराव
७. मा.जाधव साधना रामदास
८. मा.जाधव राहुल गुलाब
९. मा.पवार संगीता शाम
१०. मा.बो-हाडे शुभांगी संजय
११. मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
१२. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

याशिवाय श्री.दिलीप गावडे - क्षेत्रीय अधिकारी, श्री.विजय वाघमारे -प्रशासन अधिकारी,विश्वास नगरे - कार्यालय अधिक्षक, श्री.सतिश इंगळे - कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री.राणे आर.व्ही. - उप.अभियंता, श्री. ढवळे आ.कृ.- उप अभियंता जलनि:सारण, श्री.कुलकर्णी एस.एस.- मुख्य.आरोग्य निरीक्षक, श्री.शितोळे एस.के.कनिष्ठ अभियंता, श्री. कोटियाना डी.एम.आरोग्य निरिक्षक इ.अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सर्वांचे स्वागत करुन सभा सुरु करावी असे सांगितले. मागील सभेचा दि.१०/९/२०१४ च्या सभेचा सभावृत्तांत कार्यपत्रिका क्र. ६ च्या सभेचा सभावृत्तांत कायम करताना ठराव ३८ विषय क्र.५ दि. १०/९/२०१४ हा खालीलप्रमाणे वाचणेत यावा. प्रभाग क्र.१ मधील प्रबोधनकार ठाकरे शाळेतील खेळाचे मैदानास **"कै.नामदेव हरी भालेकर क्रीडागंण"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करणेत यावी.

मा.विश्वास नगरे कार्यालयीन अधिक्षक हे दि. ३०/११/२०१४ रोजी सेवानिवृत होत असलेने त्यांचा सत्कार मा.सभापती व इतर सन्मा.सदस्य यांचे हस्ते करण्यात आला. व त्यांनी केलेल्या कामाची स्तुती करण्यात येवुन अभिनंदन करण्यात आले.

मा.सभापती यांचे परवानगीने खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला.

विषय क्र.१ मा..वनिता थोरात व मा.स्वाती साने यांचा प्रस्ताव
प्र.क्र.४ मधील कृष्णानगर मधील शरदनगर या ठिकाणी गल्ली क्रमांक ७ या ठिकाणी माजी सैनिक “कै.श्री.आत्माराम केशवराव शिंदे” असे नामकरण करणेबाबत

विषय क्र.२ मा.मंदाकिनी ठाकरे व मा. समीर मासुळकर यांचा प्रस्ताव
प्र.क्र.२८ मधील इंदिरा गांधी गार्डन समोरील रस्त्यांला “स्वर्गीय प्रेमकुमार तिलवाणी” असे नांव देणेबाबत

विषय क्र.३ मा.मंदाकिनी ठाकरे व मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव
प्र.क्र.२८ मधील अण्णासाहेब मगर स्टेडियमची भिंत दुरुस्त करणेबाबत

विषय क्र.४ मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.फक्षेका/स्था/१/कावि/५३१/२०१४
दि.१२/११/२०१४ तरतुद वर्गीकरणाबाबत

विषय क्र.५ मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.फक्षेका/स्था/१/कावि/५३०/२०१४
दि.१२/११/२०१४ तरतुद वर्गीकरणाबाबत

विषय क्र.६ मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.फक्षेका/स्था/१/कावि/५६९/२०१४
दि. १२/११/२०१४ तरतुद वर्गीकरणाबाबत

सन्मा सदस्य/सदस्या यांची खालीलप्रमाणे चर्चा झाली.

<u>मा.भालेकर शांताराम :-/ मा.सुरेश म्हेत्रे</u>

हॉकर्स झोन जागा निश्चीतीकरणाबाबत चर्चा करणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात नियोजीत हॉकर्स झोन आहे. प्रभागनिहाय नकाशानुसार स्थळे व हॉकर्स क्षेत्र आदीबाबत चर्चा करणेत आली.

१.संबंधित अर्जदार ज्या प्रभागामध्ये वास्तव्यास असेल त्या प्रभागात निश्चित करणेत आलेल्या हॉकर्स स्थळांसाठी त्यांनाच प्राधान्य देणेत यावे.

२.संबंधित व्यावसायिकास हॉकर्स परवाना देणेपुर्वी संबंधित प्रभागातील नगरसेवकांचे शिफारसपत्र घेणेत यावे व तदनंतर परवाना देणेत यावे.

३.हॉकर्स अंतर्गत व्यावसायिकाला उपलब्ध करुन देणेत येणारी १ मीटर x १ मीटर ही जागा अपुरी असलेमुळे ५ फूट x ५ फूट उपलब्ध करुन देणेत यावी. वरील उपसुचना नुसार नगरसदस्य/नगरसदस्या यांच्या शिफारशीनुसार सदरचा विषय मंजुर करणेत आला. सदर ठराव कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही करणेत यावी.

४.ड्रेनेज वारंवार चोकअप होतात. स्वच्छता होत नाही. आजार वाढत आहे. प्रभागातील सर्व वॉर्डाची स्वच्छता करुन सन्मा.सदस्या यांच्या समक्ष भेटी घेऊन स्वच्छता झाल्याचे सांगून सन्मा सदस्य सुचवतील त्या ठिकाणी औष्णिक धुरीकरण करावे.

<u>मा.शुभांगी बो-हाडे:-</u>
प्रभागात पाणीपुरवठा व्यवस्थित होत नाही. दिवसांतून दोन वेळेस पाणीपुरवठा व्हावा.
<u>मा.संगीता पवार:-</u>
से.क्र.२२ वॉर्ड हा झोनिपु विभागात असल्यामुळे पाणी वेळेवर येत नाही. मरिआई मंदीर येथे पाण्याची लाईन टाकलेली आहे परंतु लाईन चालू केलेले नाही. प्रभागात स्वच्छता रोजचे रोज होत नाही. रोगराईचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे कच-याच्या गाडया रोजच्या रोज प्रभागात आल्या पाहिजे.
<u>मा.स्वाती साने:-</u> प्रभागात कर्मचारी स्वच्छता करीत नाही. रस्त्यावर नागरीकांच्या सहया घेऊन निघून जातात. सन्मा. सदस्या यांना काहीही माहिती होत नाही. सन्मा. सदस्या यांना सुचीत करुन औषध फवारणी करावी. औषध फवारणी व धुरीकरण करत नाहीत.
<u>मा.राहुल जाधव:-</u>
प्र.क्र.५ मधील कुदळवाडी जाधववाडी येथील मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते करणे, लाईट ची व्यवस्था नाही, कुदळवाडी हा कंपनीचा भाग असल्याने व रस्ते खराब असल्याने वाहनांमुळे रस्ते खचतात. ड्रेनेज लाईन चोकअप होतात, वेळोवेळी चोकअप काढून स्वच्छ करणे आवश्यक आहे. प्रभागात स्वच्छता होत नाही. कच-याचे प्रमाण वाढत आहे. सर्व सोसायटीमध्ये धुरीकरण, औषध फवारणी करणे.

ठराव क्र.३९ — विषय क्र.१
दि.१२/११/२०१४ — विभाग:- भुमि आणि जिंदगी
सुचक:-मा.वनिता थोरात — अनुमोदक:- मा.स्वाती साने
संदर्भ:- मा.वनिता थोरात व मा.स्वाती साने यांचा दि. १२/११/२०१४ चा प्रस्ताव
विषय:- हॉकर्स झोन जागा निश्चीतीकरणाबाबत चर्चा करणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात नियोजीत हॉकर्स झोन आहे. प्रभागनिहाय नकाशानुसार स्थळे व हॉकर्स क्षेत्र आदीबाबत चर्चा करणेत आली. प्रस्तावीत हॉकर्स झोन खालील अर्जानुसार शिफारस करुन वाढवणेत येत आहेत

१. संबंधित अर्जदार ज्या प्रभागामध्ये वास्तव्यास असेल त्या प्रभागात निश्चित करणेत आलेल्या हॉकर्स स्थळांसाठी त्यांनाच प्राधान्य देणेत यावे.
२. संबंधित व्यावसायिकास हॉकर्स परवाना देणेपुर्वी संबंधित प्रभागातील नगरसेवकांचे शिफारसपत्र घेणेत यावे व तदनंतर परवाना देणेत यावे.
३. हॉकर्स अंतर्गत व्यावसायिकाला उपलब्ध करुन देणेत येणारी १ मीटर x १ मीटर ही जागा अपुरी असलेमुळे ५ फूट x ५ फूट उपलब्ध करुन देणेत यावी. वरील उपसुचनानुसार मा.नगरसदस्य/नगरसदस्या यांच्या शिफारशीनुसार सदरचा विषय मंजुर करणेत आला. सदर ठराव कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

<u>मा.सभापती यांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय</u>

ठराव क्र.४० — विषय क्र.२
दि.१२/११/२०१४ — विभाग:- ......

सुचकः- मा.वनिता थोरात अनुमोदकः- मा.स्वाती साने

संदर्भः- मा.वनिता थोरात व मा.स्वाती साने यांचा दि. १२/११/२०१४ चा प्रस्ताव

विषय:-.प्र.क्र.४ कृष्णानगर मधील शरदनगर या ठिकाणील गल्ली क्रमांक ७ या ठिकाणी माजी सैनिक "कै.श्री. आत्माराम केशवराव शिंदे" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्र.४१ विषय क्र.३

दि.१२/११/२०१४ विभाग:-.........

सुचकः- मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदकः-मा.समीर मासुळकर

संदर्भः- मा.मंदाकिनी ठाकरे व मा.समीर मासुळकर यांचा दि.१२/११/२०१४ चा प्रस्ताव

विषय:- प्र.क्र.२८ मासुळकर कॉलनी मधील इंदिरा गांधी गार्डन समोरील रस्त्यांला "स्वर्गीय प्रेमकुमार तिलवाणी" असे नांव देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.४२ विषय क्र.४

दि.१२/११/२०१४ विभाग:-स्थापत्य

सुचकः- मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदकः-मा.समीर मासुळकर

संदर्भः- मा. मंदाकिनी ठाकरे व मा.समीर मासुळकर यांचा दि.१२/११/२०१४ चा प्रस्ताव

विषय:- प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी येथील अण्णासाहेब मगर स्टेडियमची भिंत दुरुस्त करणेबाबत

प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी येथील अण्णासाहेब मगर स्टेडियमची भिंत पडल्यामुळे त्यांच्या बाजूच्या सोसायटीला त्रास होत आहे ती सोसायटी "यशवंत सहकारी गृहरचना संस्था मर्यादित" या ठिकाणी चो-या होतात तसेच साप येतात. कारण त्या ठिकाणी नाला आहे. त्यामुळे सांडपाण्याचा त्रास होतो. त्यामुळे लवकरात लवकर अण्णासाहेब मगर स्टेडियमची भिंत बांधणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.४३ विषय क्र.५

दि.१२/११/२०१४ विभाग:-स्थापत्य

सुचकः- मा.शांताराम भालेकर अनुमोदकः-मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भः- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील क्र.फक्षेका/स्था/१/कावि/५३१/२०१४,दि.१२/११/२०१४ चा प्रस्ताव

विषय:- तरतुद वर्गीकरणाबाबत

फ क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य विभागाकडील सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामध्ये इतर खर्च" या लेखाशिर्षावर सन २०१४-१५ करीता र.रु.५०००/- तरतुद करणेत आलेली आहे. दि.३०/९/२०१४ अखेर पर्यंत खर्च झालेला नाही. परंतु नव्याने सुरु झालेल्या स्थापत्य फ क्षेत्रीय कार्यालयासाठी सर्व प्रकारचे शिक्के, कपाटांना चाव्या, संगणक साहित्य व अत्यावश्यक स्टेशनरी इ.साठी उपलब्ध तरतुदीपेक्षा जास्त खर्च झालेला आहे. सदर खर्च उपलब्ध तरतुदी मधुन खर्ची टाकता येत नाही. तरी फ क्षेत्रीय कार्यालयाचे इतर खर्चासाठी अन्य लेखाशिर्षामधुन तरतुद वर्ग

करणे आवश्यक आहे. २/- फ क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य विभागाकडील सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामध्ये अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षासाठी र.रु. ३००००/- तरतुद केलेली आहे. स्थापत्य फ क्षेत्रीय कार्यालयाकडे सध्या अस्थायी कर्मचारी नेमणुक केलेली नाही. सबब सदरच्या लेखाशिर्षामधुन र.रु.२५०००/- इतर खर्च या लेखाशिर्षावर वर्ग करणेत यावी.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुसऱ्या अर्थसंकल्पीय शिर्षात बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली करता येत असल्याने सदरचा विषय मान्य करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता सदर विषयाची कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र.४४ विषय क्र.६

दि.१२/११/२०१४ विभाग:-स्थापत्य

सुचक:- मा.शांताराम भालेकर अनुमोदक:- मा.राहुल जाधव

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील क्र.फक्षेका/स्था/१/कावि/५३०/२०१४ दि. १२/११/२०१४ चा प्रस्ताव

विषय:- तरतुद वर्गीकरणाबाबत

फ क्षेत्रीय कार्यालयाचे अतिक्रमण विभागाकडील सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामध्ये रजा प्रवास भत्ता व बोनस तथा सानुग्रह अनुदान" या लेखाशिर्षावर सन २०१४-१५ करीता अ.क्र र.रु १४००००/- व ३०००००/- तरतुद करणेत आलेली आहे.दि. ३०/९/२०१४ अखेर अनुक्रमे र.रु.१०५००/- व ३४१५००/- खर्च झालेला आहे. परंतु नव्याने सुरु झालेल्या अतिक्रमण फ क्षेत्रीय कार्यालयासाठी प्रस्तुत तरतुद अपुरी पडत आहे. उपलब्ध तरतुदीपेक्षा जादा खर्च झालेला असल्याने सदर खर्च उपलब्ध तरतुदी मधुन खर्ची टाकता येत नाही. बोनस तथा सानुग्रह अनुदान या लेखाशिर्षावर अन्य लेखाशिर्षावरुन तरतुद वर्ग करण्याच्या उमेद मान्यतेवर बील वजा तरतुद असताना मंजुर केले आहे. सबब फ क्षेत्रीय कार्यालयाचे रजा प्रवास भत्ता व बोनस तथा सानुग्रह अनुदान खर्चासाठी अन्य लेखाशिर्षामधुन तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे. फ क्षेत्रीय कार्यालयाचे अतिक्रमण विभागाकडील सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामध्ये अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षासाठी र.रु ५००००/- तरतुद केलेली आहे.अतिक्रमण फ क्षेत्रीय कार्यालयाकडे सध्या अस्थायी कर्मचारी नेमणुक केलेली नाही. सबब सदरच्या लेखाशिर्षामधुन रजा प्रवास भत्ता यासाठी र.रु. ७०००/- व बोनस तथा सानुग्रह अनुदान यासाठी र.रु४१५००/- या लेखाशिर्षावर वर्ग करणेत यावी.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुसऱ्या अर्थसंकल्पीय शिर्षात बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली करता येत असल्याने सदरचा विषय मान्य करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता सदर विषयाची कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र.४५ विषय क्र.७

दि.१२/११/२०१४ विभाग:-स्थापत्य

सुचक:- मा.वनिता थोरात अनुमोदक:- मा.अजय सायकर

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील क्र.फक्षेका/स्था/१/कावि/५६९/२०१४ ,दि. १२/११/२०१४ चा प्रस्ताव

विषय:- तरतुद वर्गीकरणाबाबत

फ क्षेत्रीय कार्यालयाचे अतिक्रमण विभागाकडील सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामध्ये स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर सन २०१४-१५ करीता अ.क्र. र.रु २५,००,००० तरतुद करणेत आलेली आहे. दि. १३/११/२०१४ अखेर २५,०६,५६८/- खर्च झालेला आहे. परंतु नव्याने सुरु झालेल्या अतिक्रमण फ क्षेत्रीय कार्यालयासाठी प्रस्तुत तरतुद अपुरी पडत आहे. उपलब्ध तरतुदीपेक्षा जादा खर्च झालेला असल्याने सदर खर्च उपलब्ध तरतुदी मधुन खर्ची टाकता येत नाही. स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर अन्य लेखाशिर्षावरुन तरतुद वर्ग करण्याच्या उमेद मान्यतेवर बील वजा तरतुद असताना मंजुर केले आहे. तरी फ क्षेत्रीय कार्यालयाचे स्थायी अस्थापना खर्चासाठी अन्य लेखाशिर्षामधुन तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे. फ क्षेत्रीय कार्यालयाचे अतिक्रमण विभागाकडील सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामध्ये अतिक्रमण पोलिस बंदोबस्त या लेखाशिर्षासाठी र.रु. २०,००,०००/- तरतुद केलेली आहे. अतिक्रमण फ क्षेत्रीय कार्यालयाकडे या लेखाशिर्षावरुन यापूर्वी अदयापी खर्च झालेला नाही. सबब स्थायी अस्थापना यासाठी र.रु. १५,००,०००/- तरतुद वर्ग करणेत यावी.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शीर्षातून दुसऱ्या अर्थसंकल्पीय शिर्षात बदली करावयाच्या रक्कमा नियमानुसार बदली करता येत असल्याने सदरचा विषय मान्य करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता सदर विषयाची कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

मा.सभापती यांनी सदरची सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
वनिता एकनाथ थोरात
सभापती
फ क्षेत्रीय कार्यालय

जा.क्र.फक्षेका/सभा/कावि/१७२/२०१४
दिनांक:-१२/११/२०१४

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
फ क्षेत्रीय कार्यालय

प्रत:- सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी